*कथा क्रमांक ६*

# Happy Birthday!

संध्याकाळची वेळ - पावसाची रिप -रिप संपून आता चांगलाच कोसळू लागला होता. हातातल्या पिशव्या सांभाळत तिने चावीने घराचं दार उघडलं आणि आधी एक कप गरम चहा ठेवला. बाहेर मुसळधार पाउस, आणि आत विचारांची बरसातच जणू होत होती. बाहेरचा पाउस स्वतःला स्पर्श करू नये म्हणून छत्री धरता येते, पण मनातल्या विचार-पावसापासून स्वतःला वाचवायला कुठल्याही प्रकारची छत्री नसते. ती भाज्या आत ठेवत असताना तिच्या मनातल्या ढगांमधून विचारांच्या जणू धाराच वाहत होत्या: मी कोण; माझ्या ह्या आयुष्याचा अर्थ काय? मी आजवर काय करून दाखवलं आहे? डिग्री हातात असलेली मी घर, संसार, ह्या गोंधळात स्वतःचे अस्तित्वच घालवून बसले आहे. नक्की काय करायचा विचार आहे माझा? आणि मी जे सध्या करत आहे ते तरी व्यवस्थितपणे पार पाडत आहे का?

श्रेयस आणि मानसी ह्यांना तिने भरपूर वेळ देउन इतकी वर्ष वाढवलं होतं खरं. तरी त्यांचं हल्लीचं विचित्र वागणं: त्यांचं खोली बंद करून कॉम्प्युटरवर दिवस-रात्र खेळ खेळणं, हाक मारली तरी दुर्लक्ष करणं ... अशा मित्रांपासून मिळवलेल्या छोट्या -छोट्या सवयींपासून त्यांना दूर नेणं, त्यांचे मन अभ्यासाकडे वळवणं, ह्या सर्व गोष्टींकडे लक्ष देउन देउन थकून गेलेलं तिचं मन आज पाण्याने जड झालेला जणू ढगच. ह्या सवयी रोज रोज गोड बोलून, उदाहरणं दाखवून, हळू हळू मोडण्याचा प्रयत्न करणे हे कार्य कुठला तरी पर्वत चढण्या इतकं कठीण होतं हल्लीच्या जगात. किंवा विमानाच्या टेक-ऑफ इतकं कठीण. पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणा इतके जबरदस्त मुलांना स्वतःकडे ओढून घेणारे हे छंदः त्यांचा सामना करायला एनर्जीचा साठा लागतो खरंच.

हे घरच तिचं ऑफिस होतं. त्या मुळे ऑफिस मधल्या छोट्या छोट्या गोष्टी जशा एखाद्या बॉस ला खटकतात किंवा लक्षात येतात तसं तिचं घरी होत होतं. पण ऑफिसच्या बॉस ला सुट्टी घेता येते. घर नावाच्या कार्यालयापासून कसली सुट्टी! जरी स्वतःला घराबाहेर काढलं काही दिवसांसाठी तरी मनात मुलं, नवरा, त्यांचं सगळं कसं चाललंय, हे विचार सतत सोबती म्हणून येतातच ... न बोलावता.

मनात साठलेले ढग बरसले तरी नवीन समस्यांच्या समुद्रातून पुन्हा नवीन ढग निर्माण होतातच की! जुन्या काळज्या सरल्या तरी रोज उत्पन्न होणाऱ्या नवीन काळज्यांनी स्वाती आज थकून गेली होती. असो.

ओले कपडे बदलून चहाचा पहिला घोट घेतल्यावर थोडंसं बरं वाटलं तिला. अर्धा तास पुस्तक वाचून डी-स्ट्रेस करायला हवे स्वतःला; मग घरातली सगळी कामं ...

पहिली दोन पाने वाचल्यावर पुन्हा कामं समोर दिसायला लागली. पुस्तक पण पुष्पा म्हणाली होती तितकं इंटरेस्टिंग नव्हतं. नाही तर बसली असती ती थोडा वेळ. भाजी चिरायला आत जाणार तोच दाराची बेल वाजली.

नवऱ्याला आल्या पावली grocery आणायला पिटाळावा ह्या विचारातच स्वाती दरवाज्याकडे निघाली, पण जाता जाता तिलाच परत वाटले एवढे पावसात कुठे पाठवायचे, त्यापेक्षा आज सरळ पास्ता करावा, त्याला फारसे काही लागत नाही. पण दार उघडले तर नरेश पाठीमागे हात घेऊन हसत उभा होता. मागे हळूच खिदळण्याचा आवाज आला म्हणून तिने मागे वळून पहिले तर दोन्ही मुले हसत हसत उभी होती. Video games  इतक्या लवकर कसे काय संपले अशा संभ्रमातच तिने परत नरेशकडे पहिले. त्याच्या पाठीमागचे हात पुढे आले होते आणि त्यात एक मोठ्ठा पुष्पगुच्छ होता. 'Happy Birthday आई', असे मुले जोरात ओरडली आणि नरेश आणि मुलांनी तिला एकत्रच मिठी मारली. ह्या सगळ्या surprise मुळे स्वाती एकदम गांगरूनच गेली. सर्वांनी तिला स्वयंपाकघरात नेले आणि तिथे एक छान केक सजवून ठेवला होता. केक कापून सगळ्यांनी एकमेकांना भरवला आणि हात धुवायला म्हणून ती बाथरूममध्ये शिरली तेव्हा विचारांचा पाऊस परत सुरु झाला. आपला वाढदिवस आपण कसा काय विसरलो? आणि चक्क बाकी सगळ्यांनी तो लक्षात ठेवला? तिच्या physicsच्या वर्गात शिकवलेले फोर्सेसचे चार बेसिक प्रकार तिला आठवले. अरेच्चा खरच की, गुरुत्वाकर्षण हा सर्वात दुबळा फोर्स. त्यांच्या छंदांच्यापेक्षाही जोरदार असा प्रेमाचा, मायेचा फोर्स आहे ह्या विचाराने तिचा मगाचा कंटाळा पळून गेला. माणसाच्या सगळ्या भावनांमध्ये सगळ्यात शक्तिशाली भावना कुठली असावी ह्यावर एक पुस्तक लिहावे ह्या विचारातच ती आपल्याला सुचलेल्या ह्या उपमेवर खुश होत परत बाहेर आली.

नरेशने ताबडतोब तिला तयार व्हायला सांगितले कारण सगळ्यांनी तिच्या आवडीच्या ठिकाणी जेवायला जायचे ठरवले होते. बाहेर पाउस तसाच तुफान बरसत होता, पण का कुणास ठाऊक तेव्हा तिला तो तितकासा वाईट वाटला नाही. कारमधल्या रेडीओवर नरेशच्या आवडीचा NPR लागला होता. मानसी मात्र आनंदात तिच्या आवडीचे जस्टीन बीबर चे गाणे म्हणत होती. नुकतीच तेरा वर्षाची झाल्याने तिला अचानक आपण टीनेजरप्रमाणे वागले पाहिजे असे वाटत होते. श्रेयस मात्र सोळा वर्षाचा असल्याने, ती गाणी ऐकून तोंडे वाकडी करत होता. त्याला सध्या नक्की कुठल्या प्रकारचे संगीत आवडते हे तिलाही नक्की आठवत नव्हते. पण ह्या सगळ्या मनस्थितीत आणि बाहेरच्या वातावरणामुळे की  काय  स्वातीच्या मनात मात्र मल्हार भरला होता

अचानक रेडीओवर static सुरु झाली. National weather service कडून इमर्जन्सी मेसेज होता. त्यांच्याच भागात टोर्नेडो दिसले होते आणि सर्वांनी ताबडतोब आसरा शोधावा असे ते सांगत होते. मेसेज पूर्ण व्हायच्या आतच अचानक जोरात रेल्वेगाडीसारखा आवाज येऊ लागला आणि काही क्षणात एका प्रचंड शक्तीने त्यांची कार हवेत उचलली गेली. ती परत खाली आदळली तेव्हा डोळे विस्फारून स्वाती मुलांकडे पाहत होती, किंचाळूनही तिचा आवाज मात्र तिला ऐकू येत नव्हता. पुढे होणाऱ्या घटनांमध्ये मानवी भावनांचे सगळेच पैलू तिला दिसणार होते आणि मगाशी पडलेला आयुष्याच्या अर्थाचा प्रश्नही सुटणार होता हे मात्र तेव्हा तिला ठाऊक नव्हते.

सगळीकडे नुसता गोंधळ उडाला होता .अचानक आलेल्या ह्या टोर्नाडो ने तर सगळ्यांचीच वाट लावली होती .उंच उंच झाडे वाकली होती , त्यांच्या फांद्या लोंबकळत होत्या , इकडे तिकडे फेकल्या जात होत्या . वारे इतक्या वेगाने वाहत होते कि त्यामुळे घरांची छपरं उडत होती. दुकानांच्या खिडक्यांचे पानेल्स उडून जात होते. पावसाच्या झोतात काही दिसत नव्हते .रस्त्यावरची लोक जागा मिळेल तिथे कशीही धावत सुटली होती . पोलिसांच्या गाड्या लोकांना सावरण्यासाठी येत होत्या .ह्या सगळ्या गोंधळात गाडी चालवणे केवळ अशक्य होते, त्यामुळे नरेशला घरी परत जाणे हि कठीण होते.कशाला ह्या हॉटेलच्या फंदात पडलो, असा चौघांनाही वाटत होते . नरेश ने परिस्थितीचा अंदाज घेत स्वाती व मुलांना गाडीतून खाली उतरून आडोश्याला उभे राहण्यास सांगितले. ते तिघं उतरून जात असतानाच अचानक बाजूच्या बिल्डिंगचा वरचा मजला कोसळला आणि एकंच धावपळ सुरु झाली . नरेश गाडी lock करून बाहेर येतच होता , त्याला स्वातीच्या हाका ऐकू आल्या . ती ओरडत होती "मानसी , मानसी कुठे आहेस ?" त्या बिल्डिंग मध्ये फारसे कोणी रहात नसल्याने जीव हानी झाली नाही , पण खालून जात असलेली माणसे त्या ढिगाऱ्या खाली सापडली होती . नेमकं त्याच बिल्डिंग च्या बाजूला हे तिघं जात होते आणि मानसी पुढे होती. स्वातीच्या काळजात धस्स झालं. तीला भीती वाटू लागली , मानसी ह्या debris खाली तर नसेल. आजूबाजूला इतका आवाज आणि गोंधळ होता कि तिचा आवाज मानसी पर्यंत अथवा मानसीचा आवाज तिच्यापर्यंत पोहोचणं अवघड होतं. स्वाती जीवाच्या आकांताने मानसीला हाका मारत होती . नरेश तिथे पोहोचताच दोघे तिला शोधू लागले . स्वातीला आता कशचच भान नव्हत. नरेश हि पूर्ण panic मध्ये होता . तितक्यात तिथे एक गाडी आली आणि त्यातून काही लोक उतरले . ते सगळ्यांना त्या बिल्डिंग पासून लांब जाण्यास सांगत होते , कारण अजूनही काही भाग पडण्याची भीती होतीच. ते सर्वांना तिथून जवळ जवळ हाकलून देत होते . त्यांच्या पैकी एक माणूस नरेश जवळ आला आणि त्याने त्याला तिथून लांब जाण्यास सांगितले . दोन तीन वेळेला सांगून हि नरेश जेव्हां ऐकें ना तेव्हां तो माणूस नरेश वर चिडला . मानसी सापडत नसल्याने नरेश हि सैर भैर झाला होता . त्याने चिडून त्या माणसावर हात उचलला , आणि लगेचच त्याला त्याची चूक लक्षात आली .त्याने एका साध्या वेशातल्या पोलिसावर हात उचलला होता , आणि तेही अमेरिकेतल्या. नरेश भानावर आला पण तो पर्यंत तो पोलिसांच्या गाडीत होता . एक तर मानसी मिळत नव्हती आणि आता हे काय विचित्र घडलं. स्वाती तर भांभावून गेली होती. नरेशला सोडा , त्याच्या हातून चूक झाली, आमची मुलगी सापडत नाहीये , हरवलीये असं रडत भेकत, ती पोलिसांकडे गया वया करत होती , त्यांनी नरेशला सोडावं म्हणून आर्जव करत होती. पण पोलिस काही ऐकेनात . नरेशच्या हातून नकळत का होईना गुन्हा घडलाच होता . मानसीला शोधून काढण्याचे आश्वासन देत एक पोलिस नरेश बसलेली गाडी घेऊन निघून गेला आणि उरलेले लगेच देब्रीस च्या खाली अडकलेल्या माणसांना वाचवण्याच्या कामी लागले . स्वाती आणि श्रेयस ढसा ढसा रडू लागले . काय होतंय समजायच्या आत होत्याच नव्हत झालं होतं . पोलिस मानसीला शोधत होते . नरेशच्या मनाची काय अवस्था होत असेल ह्या विचाराने स्वातीचे काळीज तुटत होते . तिला वाटलं नक्की heart attack येईल आता ,पण असं घाबरून सोडून जाण तिच्या स्वभावात नव्हत . तिला आणि श्रेयस ला आडोश्याला बसवत पोलिस हरवलेल्यांचा तपास घेत होते . स्वातीच्या आजू

बाजूला असे कितीतरी जण उभे होते , रडत होते ओरडत होते , जखमी झालेले विव्हळत होते. पण तिचं ह्या कशातच लक्ष नव्हत . तिला दुपार आठवत होती . काय काय विचार करत होते मी . आपण नोकरी करत नाही, रोज रोजच्या समस्यांना तोंड देऊन देऊन कसे वैतागलो आहोत , मुलांना शिस्त लावण्याच कठीण काम करायला किती त्रास होतो. हे सगळे विचार करताना हे असं काही होईल , इतकी कठीण समस्या आपल्या आयुष्यात येऊ शकेल ह्याचा अंदाजच नव्हता तिला . ह्या समस्ये पुढे तिच्या दुपारच्या समस्या अतिशय बालिश आणि फालतू वाटू लागल्या तिला ." काय म्हणत होते मी ? काय अर्थ आहे अश्या आयुष्याला !"..तिला वाटले नियतीने तिला आयुष्याचा अर्थ चांगल्याच पद्धतीने समजावला होता. नियतीने दिलेली हि वाढदिवसाची भेट तिच्या स्मरणात मरेपर्यंत राहणार होती .तिच्या मनात विचार आला , अजून बरच काही बाकी आहे तर आणि आपण किती क्षुल्लक गोष्टींचा  बाऊ करत होतो इतके दिवस. त्या हि परिस्थितीत तिला आपल्या विचारांवर  हसू आले . म्हणतातच ना अति झाले नि हसू आले .तिचं मन रडून रडून थकलं होतं आणि डोकं सुन्न झालं होतं.

911 च्या गाड्या, अँब्युलन्स, पोलीस - हाहा:कार उडालेला, सर्व यंत्रणा ढिगाऱ्याखाली अडकलेल्या जीवांना बाहेर काढून त्यांना वाचविण्याच्या आटोकाट प्रयत्नात. नरेश पोलीस स्टेशनवर!

"I am very very sorry, officer. I did not do it intentionally. Please believe me, my daughter is missing. Perhaps she is under the debris." नरेश पोलीस इन्स्पेक्टरची याचना करत होता. अखेरीस एकंदरीत परिस्थिती लक्षात घेऊन त्या इन्स्पेक्टरने नरेशची सुटका केली आणि पुन्हा असं काही घडलं तर परिणाम फार गंभीर होतील याची त्याला कल्पना दिली. पोलिसांच्याच व्हॅनने नरेश पुन्हा घटनास्थळी येऊन दाखल झाला.

बऱ्याच लोकांना जवळच्याच Queen Mary हॉस्पिटलमध्ये उपचारास नेल्याचं कळलं, तेव्हा स्वाती, नरेश, श्रेयस सर्वांनीच तिथे धाव घेतली. बऱ्याच शोधाशोधीनंतर मानसीचा पत्ता लागला. तिला बेशुद्धावस्थेत पाहून स्वाती मटकन् खालीच बसली. ' कसला वाढदिवस आणि कसलं काय, आपण इतक्या पावसात बाहेर पडलो हीच चूक झाली' असं त्यावेळी सगळ्यांच्याच मनात आलं. पण जे व्हायचे असतं ते होणारच. आपल्या हातात काय आहे? 'आले देवाजीच्या मना, तेथे कोणाचे चालेना.' हेच खरं.

हळूहळू मानसीच्या प्रकृतीत सुधारणा होत होती. तिचा डावा हात मात्र प्लास्टरमध्ये राहणार होता 40 दिवस. कपाळावरच्या व हातावरच्या जखमा भरल्या होत्या एव्हाना. थोडे व्रण शिल्लक होते. परंतु प्रत्यक्ष घटनेची तिच्या मेंदूमध्ये जी नोंद झाली होती ती कोणत्याही औषधाने पुसली जाणारी नव्हती. तिची झोप उडाली होती. सतत तिच्या कानात घोंघवणाऱ्या वाऱ्याचा आवाज येत होता. मधूनच ती "save me, save me" असं ओरडत उठत होती. सतत स्वतःच्या रूममध्ये असणारी मानसी आता कोणत्याही खोलीत एकटी रहायला घाबरत होती. शाळेतून मिस् चे फोन यायचे, " मानसी कोणाशीच बोलत नाही, केलेलं होमवर्क कधी दाखवते तर कधी दाखवतच नाही, बाहेरून थोडासा जरी कसला आवाज आला तरी तिचा थरकाप होतो."

डॉक्टर सांगायचे, " होईल सगळं हळूहळू नॉर्मल. धीर धरण्यापलीकडे आपल्या हातात काहीच नाही."

रोमा मानसीची चांगली मैत्रीण होती. तिच्याच वयाची आणि त्यांच्या जवळच्याच कम्युनिटीत राहणारी. स्वातीला वाटले, दोघी समवयस्क असल्यामुळे त्यांच्या आवडी-निवडी, गप्पांचे विषय यात साम्य असू शकतं, तेव्हा जर रोमा मानसीच्या सहवासात जास्त काळ राहिली तर मानसी जरा काही बोलेल आणि तिच्या मनातली भीती हळूहळू कमी होईल. क्षणाचाही विलंब न लावता स्वातीने रोमाला फोन लावला..

स्टोरी ६_५

रोमाने  फोनवर स्वातीला प्रॉमिस केले कि ती मानसी बरोबर खूप खेळेल,तिच्याकडे खूप गेम्स आहेत.रोज दुपारी स्वाती मानसीला रोमाकडे सोडून येत असे.४-५ दिवस रोमा आणि मानसी एकत्र होत्या,नंतर मात्र रोमाने मानसीला टाळायला सुरवात केली,आज कुठे बाहेर जायचे आहे,आज काय क्लास आहे,दुसरी फ्रेंड येणार आहे किंवा असेच काहीतरी.

रोमाने एकदिवस स्वातीला सांगितले कि “aunty मानसी  काही खेळत नाही,तिला काही समजत नाही, मग मी कसे खेळू तिच्याबरोबर” स्वातीने तो नाद सोडून दिला.नरेशला खोदून खोदून विचारल्यावर त्याने सांगितले “आपल्याला डॉक्टरने सांगितले कि मानसी  गुमसुम असते, ती घाबरली आहे पण नुसते तेव्हढेच  नाही तर तिचा पार्शल मेमरी लॉस  आहे हा म्हणून ती गप्प असते.तिला शाळेत ही  काही समजत नाही कारण तिला काही आठवत नाही. तू जास्त टेन्शन घेऊ नये म्हणून मी तुला बोललो नाही ”. स्वाती च्या मनात एकदम धस्स झाले हे कुठपर्यंत चालणार आहे या विचाराने ती अस्वस्थ झाली.

डॉक्टर आणि नरेश बरोबर तिने चर्चा केली,तेव्हा डॉक्टर म्हणाले आपल्याला थोडे दिवस तरी वाट पाहायला लागणार आहे त्यानंतर उपचारांची दिशा ठरविता येईल. तेरा वर्षाची मानसी अगदी कोमेजून गेली होती अखंड उत्साहाचा  झरा जणू आटून गेला होता. श्रेयस सुद्धा मानसीच्या अवती भवती राहून तिचे मन रमविण्याचा प्रयत्न करत असे.

मुलांच्या समस्या, त्यांचे TV बघणे, त्यांचा अभ्यास घेणे स्वाती सर्व विसरली होती. स्वातीने मानसीला  शाळेत पाठविणे पण बंद केलं होत, फक्त तिच्याशी  सारखे  बोलून तिला काही आठवते का याचा ती प्रयत्न करत असे. आनंदाचा रंगमंच असणारे घर उदासिनतेच्या छायेत हरवून गेलं  होत.

स्वाती नरेशचे इतर प्रयत्न पण सुरु होते,कुणी भारतातून आयुर्वेदिक जडीबुटी पाठ्वली होती,कुणी अंगारा धाडला होता.तिरुपती बालाजी, सिद्धी विनायक,तुळजापूरची देवी शिर्डीचे  साईबाबा असे सर्वांना  नवस बोलून झाले होते.

मानसीत काही फरक पडत नव्हता.सगळ्या पार्ट्या,आउटींग सगळे बंद झाले होते.फक्त श्रेयसला ती आवर्जून पाठवीत असे कारण त्याचे हसण्या खेळण्याचे दिवस होते आणि त्याने सफर व्हायला नको.

मुसळधार पाउस कोसळत होता.अचानक वादळाची शक्यता वर्तवली गेली होती.तेवढ्यात श्रेयस चा फोन आला.झाड पडल्यामुळे स्कूल बस मेन रोड वर थांबली  होती, तिला श्रेयसला आणायला जायचे होते,मानसीला एकटे सोडून जाता येत नव्हते ,म्हणून तिने मानसीला बरोबर घेतले,छत्री घेतली, मेन रोड ३-४ मिनिटांवर होता. श्रेयस ला कलेक्ट केले.

वारा जोरात वाहत होता. घराच्या गेट जवळ झाडाची एक फांदी अचानक तुटून त्यांच्या अंगावर पडली.अचानक फांदी  पडल्याने दोघींचा तोल गेला,स्वाती ला हाताला खूप लागले होते, श्रेयस बाजूला असल्यामुळे त्याला फक्त खरचटले होते.दोघांनी मानसीला  उठविले पण तिची शुध्द हरपली होती. श्रेयसने लगेच daddy ला  फोन केला. स्वाती त्या प्रकाराने हादरून गेली होती काय लिहले आहे पोरीच्या आणि आपल्या नशिबात कोण जाणे?

डॉक्टरांनी स्वातीची जखम पुसून  bandage  बांधले.

'' मानसी कशी आहे डॉक्टर ?" स्वाती ने विचारले

"She is ok "

तेव्हढ्यात मानसी दुसऱ्या रूम मधून धावत आली आणि म्हणाली , "ममा तू कशी आहेस? are you ok? लागलं नाही न फार?" मानसीच्या कपाळाला पट्टी बांधली होती आणि पायाला थोड लागला होत.

नरेश म्हणाला "thank god,तुम्हाला कोणाला जास्त लागले नाही,श्रेयसचा फोन आला तेव्हा मी घाबरूनच गेलो होतो."

मानसीने स्वातीला घट्ट मिठी मारली आणि ती म्हणाली "ममा चल आपण घरी जाऊ लवकर, पाऊस जोरात कोसळतो आहे,आणि हे बघ तू आता जास्त काम करू नकोस आपण पार्सल मागवू ,चायनीज aunty कडून ,ok"

स्वाती आश्चर्याने मानसीकडे बघत होती,जणू तिचा पुनर्जन्म झाला होता पूर्वीची मानसी त्यांना परत मिळाली होती.

मानसीची लगबग चालली होती,नरेश ने तिला जवळ घेतले "बेटा, एव्हढी धावपळ करू नकोस,"

"मला कुठे लागले आहे? ममा ची काळजी घ्यायला पाहिजे." ती लगेच म्हणाली.

सर्वजण घरी आले,पाऊस आता थांबला होता,आकाशातील मळभ दूर झाले होते लख्खं ऊन पडले होते.

वर्षभर घराने काय सोसले याचा स्वाती विचार करत होती,लहान लहान प्रोब्लेम्स आता कुठच्या कुठे पळाले होते,प्रोब्लेम काय असतो याचा स्वाती ने पुरेपूर अनुभव घेतला होता. एखद्या सिनेमात घडावे तसे घडले होते. भारतात जाऊन सर्वांना भेटून यायला हवे आणि नवसही फेडायला हवेत म्हणून स्वातीने कॅलेंडर बघितले, आज तिचा वाढदिवस होता,कुणाच्या लक्षात नव्हता,आज केक कापला नाही,कुणी टाळ्या वाजविल्या नाहीत पण देवाने खऱ्या अर्थाने तिचा Happy Birthday साजरा केला होता आणि तिला अमूल्य अशी गिफ्ट दिली होती.स्वातीच्या डोळ्यात पाणी आले आणि तिने श्रद्धेने देवासमोर हात जोडले.